सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे ,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- homebranchpune@gmail.com

वाचा :- १) आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005

२) महाराष्ट्र शासन क्रमांक करोना 2020/प्रा क्र.58/आरोग्य/5 दिनांक 14 मार्च 2020

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,
क्र.कक्ष/कावि/४१७/2020.
पुणे, दिनांक :- १५ /03/2020.

**आदेश**

राज्य शासनाने करोना विषाणूचा ( कोव्हीड १९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३, व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून पुणे जिल्ह्यामध्ये नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी जिल्यात सामाजिक, राजकिय, धार्मिक, क्रिडाविषयक कार्यक्रमांना पुढिल आदेश होईपर्यंत परवानगी देण्यात येवू नये. तसेच यापूर्वी देण्यात आली असल्यास ती परवानगी रद्द करण्याच्या सूचना,साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार देण्यात येत आहे.

उपरोक्त आदेशाचे अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने अथवा संस्थेने भारतीय दंड संहिता १८६०(४५) याच्या कलम १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल आणि पुढिल कार्यवाही करण्यात येईल.

जिल्हाधिकारी पुणे

(नवल किशोर राम)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

प्रति,

१. सर्व विभागप्रमुख, ------------------, पुणे जिल्हा

प्रत :- १. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.